
Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com

दैनिक

# अतुल्य महाराष्ट्र




मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ | बीड महाराष्ट्र | बुधवार, 15 एप्रिल 2026 | अंक क्र. 325 | वर्षे 3 रे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे संपूर्ण जगासाठी ज्ञानाचे प्रतीक, त्यांचे विचार जगाला प्रेरणा देत राहतील : धनंजय मुंडे

■ परळी वैद्यनाथ (प्रतिनिधी)

देशाचे संविधानकर्ते, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे ज्ञानाचा अथांग सागर होते. ते केवळ एका समाजाचे नाही तर संपूर्ण जगासाठी ते ज्ञानाचे प्रतीक आहेत. महामानवाचे कर्तृत्व आणि विचार हे आपल्या सर्वांना प्रेरणा देणारे आणि प्रगतीकडे घेऊन जाणारे आहेत. देशाला स्वातंत्र्य आणि समतेचा जो महान संदेश त्यांनी दिला तोच संदेश आजही समाजाला एकत्र बांधून ठेवण्याचे काम करत आहे. त्यामुळे आपण सर्वांनी देखील बाबासाहेबांच्या विचारांचा वारसा आपल्या कृतीत आणायला हवा, असे आवाहन माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांनी केले आहे.



भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या 135 व्या जयंतीनिमित्त परळी वैद्यनाथ शहरातील रेल्वे स्थानक परिसरातील भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास धनंजय मुंडे यांनी सहकाऱ्यांच्या समवेत पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी उपस्थितांना शुभेच्छा देताना धनंजय मुंडे यांनी प्रसारमाध्यमांच्या माध्यमातून देशवासी यांना भीम जयंतीच्या शुभेच्छा देत मोलाचा संदेश दिला आहे. तद्नंतर धनंजय मुंडे यांनी परळी शहरातील भीम नगर, जगतकर गल्ली, रोडे गल्ली, साठेनगर, इंदिरानगर, भीमा नगर, मिलिंद नगर, उकळवेस, नागसेन नगर इत्यादी ठिकाणच्या बुद्ध विहार व ठिकठिकाणी आयोजित भीम जयंती कार्यक्रमानिमित्त भेटी देऊन महामानव भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करत ठीक ठिकाणी पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण केले. धनंजय मुंडे यांच्या हस्ते आजच्या शुभमुहूर्तावर मिलिंद नगर येथे उभारण्यात आलेल्या भव्य नालंदा बुद्ध विहाराचे यावेळी लोकार्पण देखील करण्यात आले, यावेळी नगराध्यक्षा सौ. पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी, बाजीराव धर्माधिकारी, प्रा. डॉ. विनोद जगतकर, रवींद्र गित्ते, श्रीकृष्ण कराड, अनंत इंगळे, यांसह नगरसेवक, पदाधिकारी आदी उपस्थित होते.

### धनंजय मुंडेंनी परळीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यास केले अभिवादन

---

### शहरातील ठिकठिकाणच्या भीमजयंती कार्यक्रमांना दिल्या भेटी





## काळमवाडी शाळेत डॉ. आंबेडकर जयंती विविध उपक्रमांनी साजरी

### 260 विद्यार्थी आणि शिक्षकांना केले सन्मानित

■ शिराळा /प्रतिनिधी

वाळवा तालुक्यातील काळमवाडी येथील जिल्हा परिषद शाळेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती विविध उपक्रमांनी साजरी करण्यात आली. प्रारंभी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. प्रमुख पाहुणे प्रसिद्ध व्याख्याते उत्तम गावडे होते. अध्यक्षस्थानी सरपंच सौ. सविता सावंत होत्या.

जयंतीनिमित्ताने आयोजित केलेल्या चित्र रंगभरण स्पर्धा, हस्ताक्षर स्पर्धा, निबंध स्पर्धा आणि फटाकेमुक्त दिवाळी अभियानांतर्गत पुस्तक संग्रह स्पर्धेचे बक्षीस वितरण युवा उद्योजक सत्यजित वेटम यांच्यावतीने करण्यात आले. यावेळी २६० विद्यार्थी आणि नऊ शिक्षकांना शिल्ड आणि सन्मानपत्र



देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी उत्तम गावडे म्हणाले, विद्यार्थ्यांनी करिअरमध्ये यशस्वी होण्यासाठी शालेय जीवनातच ध्येय निश्चित केले पाहिजे आणि त्या दिशेने वाटचाल केली पाहिजे. जिद्द, प्रचंड मेहनत, आणि कष्टाच्या जोरावर यशाला गवसणी घालता येते. शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अजित सावंत म्हणाले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा आपण जोपासला पाहिजे. भारत देशाला संविधान देण्याचे फार मोठे कार्य बाबासाहेबांनी केले आहे.

## परळीत ब्राह्मण सभेच्या वतीने 22 एप्रिल रोजी 46 वा सामुदायिक उपनयन संस्कार सोहळा

### विशेष गौरव: नवनिर्वाचित नगराध्यक्षा सौ.पद्मश्रीताई धर्माधिकारी व समाजातील लोकप्रतिनिधींचा होणार सत्कार

■ परळी वैजनाथ (प्रतिनिधी):

येथील ब्राह्मण बहुद्देशीय सभेच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यावर्षीही ४६ व्या सामुदायिक उपनयन संस्कार (मुंज) सोहळ्याचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. बुधवार, दिनांक २२ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ८:५२ च्या शुभ मुहूर्तावर प्रभू वैद्यनाथ मंदिर परिसरातील दर्शन मंडप येथे हा सोहळा पार पडणार आहे. या सोहळ्यात परळीच्या नवनिर्वाचित नगराध्यक्षा सौ.पद्मश्रीताई धर्माधिकारी व समाजातील लोकप्रतिनिधींचा सत्कार सकल ब्राह्मण समाजाच्या वतीने करण्यात येणार आहे.

गेल्या ४५ वर्षांची प्रदीर्घ आणि उज्ज्वल परंपरा लाभलेल्या या सोहळ्याला संपूर्ण महाराष्ट्रात विशेष मान्यता आहे. अत्यंत शिस्तबद्ध नियोजन आणि मांगल्याच्या वातावरणात होणारा हा उपक्रम परळी नगरीचे भूषण मानला जातो. यावर्षीच्या सोहळ्यासाठी नोंदणी पूर्ण झाली असून एकूण २१ मुंजी निर्धारित करण्यात आल्या आहे. या पवित्र मंगल सोहळ्यासाठी भागवतमर्मज्ञ ह. भ. प.बाळूमहाराज उखळीकर यांची आध्यात्मिक उपस्थिती राहणार आहे.याच कार्यक्रमाचे औचित्य साधून सकल ब्राह्मण समाजाच्या वतीने परळी वैजनाथ नगरीच्या नवनिर्वाचित नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांचा विशेष सत्कार करण्यात येणार आहे. तसेच नगरसेवक पदी निवड झाल्याबद्दल माजी नगराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी आणि नगरसेवक देवीप्रसाद ऊर्फ राजा पांडे यांचाही गौरव केला जाणार आहे. तरी या मंगलमय प्रसंगी आणि सत्कार समारंभास समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन ब्राह्मण बहुद्देशीय सभा, परळी वैजनाथ यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घटनेच्या माध्यमातून पीडित शोषित वंचितांना न्याय दिला : प्रा. टी.पी. मुंडे ; पंचशील नगर येथे निळ्या ध्वजाचे ध्वजारोहण संपन्न

■ परळी वैजनाथ प्रतिनिधी

"डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या संविधानामुळे देशात लोकशाहीची खरी ज्योत प्रज्वलित झाली असून समानता, स्वातंत्र्य आणि बंधुता या मूल्यांच्या आधारावर समाज व राष्ट्र घडत आहे तसेच देशातील पीडित शोषित आणि वंचित घटकांना घटनेच्या माध्यमातून न्याय दिला असे प्रतिपादन शिवसेना नेते प्रा. टी.पी. मुंडे सर यांनी केले. ते पंचशील नगर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या 135 व्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते.

सर्वप्रथम परळी येथील रेल्वे स्थानक परिसरात असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून त्यांनी विनम्र अभिवादन केले. यावेळी व्यासपीठावर महेश बँकेचे अध्यक्ष ओमप्रकाश सारडा, शिवसेनेचे ज्येष्ठ नेते भीमराव मुंडे, विनायक गडदे, परळी नगरपालिकेच्या पाणीपुरवठा सभापती श्रीमती जयश्रीताई रवींद्र गीते, उद्योजक तथा नेते रवींद्र गीते, कैलास डुमणे, बाबासाहेब सोनवणे, दत्ताभाऊ सावंत, सुभाष वाघमारे आदी उपस्थित होते.

त्यानंतर पंचशील नगर येथील बौद्ध विहारात त्यांच्या हस्ते निळ्या ध्वजाचे ध्वजारोहण संपन्न झाले. पुढे महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर तसेच तथागत गौतम बुद्ध यांच्या मूर्तीसमोर दीप प्रज्वलन व पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. जयंती उत्सव समिती, पंचशील नगर यांच्या वतीने प्रा. टी.पी. मुंडे व उपस्थित पाहुण्यांचे आतिषबाजी व फटाक्यांच्या गजरात उत्साहात स्वागत व





सत्कार करण्यात आले. जयंतीच्या औचित्य साधून स्पर्धा घेण्यात आल्या होत्या त्या स्पर्धेचे बक्षीस वितरण मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी कार्यक्रमाचे प्रस्ताविक राजन वाघमारे यांनी केले तर सूत्रसंचालन व आभार संदिपान मुंडे यांनी केले. उभयंतांचे स्वागत तसेच सत्कार जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष प्रदीप भैय्या (बबलू शेठ) मुंडे यांनी व अण्णा सरवदे ,प्रवीण घाडगे, अक्षय ढगे, विजय सरवदे,राहुल डुमणे , राजू सरवदे, अनिकेत सोनवणे, अजय सरवदे, सुमित कांबळे, राजरत्न सरवदे ,अनिल सरवदे,जावळे भाऊ तसेच त्यांच्या पदाधिकाऱ्यांनी केले.कार्यक्रमास बौद्ध उपासक व उपासिका तसेच पंचशील नगर येथील नागरिक युवक महिला मोठ्या संख्येने उपस्थिती होत्या.

# संपादकीय

## भविष्यवेधी संकल्प

कोणत्याही राज्याचा अर्थसंकल्प म्हणजे मुद्दलात 'जमा-खर्चाचा वार्षिक ताळेबंद'च असतो. पण, राज्याच्या उत्पन्नाचे स्त्रोत काय आहेत आणि उत्पन्नाचा विनियोग राज्यकर्ते कोणत्या प्राधान्यक्रमाने करताहेत, यावरून राज्याचा इतिहास-वर्तमान आणि भविष्य अशा तीनही काळांचं स्वच्छ दर्शन होतं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल विधानसभेत 'समृद्ध महाराष्ट्राचा भविष्यवेधी अर्थसंकल्प' सादर केला. नव्या पिढीतील नेतृत्वाकडे राज्यांची सूत्रं गेल्यापासून साधारणतः गेल्या दहा वर्षांत देशातील अनेक राज्यांत परकीय गुंतवणुकीसाठी, केंद्राच्या योजनांमध्ये अधिक वाटा मिळवण्यासाठी, नवोद्योग आणि नवोपचारांना आकर्षित करण्यासाठी, पायाभूत सुविधांच्या विस्तारातून आपलं राज्य अधिकाधिक उद्योगस्नेही करण्यासाठी निकोप स्पर्धा सुरू आहे. या सर्व नवनेतृत्वामध्ये फडणवीस यांचा नंबर सर्वात वर आहे. त्यामुळे, महाराष्ट्रातील कारभाराकडे, इथल्या योजना आणि त्यासाठीच्या विविध तरतुदींकडे इतर राज्यांचं बारकाईने लक्ष असतं. त्या सर्व विकासेच्छु नवनेतृत्वाने अनुकरण करावं, असाच महाराष्ट्राचा यंदाचा अर्थसंकल्प आहे, यात वाद नाही. फडणवीस यांच्या दूरदृष्टीचा, सम्यक विचारांचा आणि विकासशील नीतीचा प्रत्यय त्यातील वाक्या-वाक्यातून येतो आहे. कोणत्याही राज्याचा अर्थसंकल्प म्हणजे मुद्दलात 'जमा-खर्चाचा वार्षिक ताळेबंद'च असतो. पण, राज्याच्या उत्पन्नाचे स्त्रोत काय आहेत आणि उत्पन्नाचा विनियोग राज्यकर्ते कोणत्या प्राधान्यक्रमाने करताहेत, यावरून राज्याचा इतिहास-वर्तमान आणि भविष्य अशा तीनही काळांचं स्वच्छ दर्शन होतं. सामाजिक व्यवहाराच्या प्रत्येक क्षेत्राचा विचार करून, त्यातल्या बाबींवर भरघोस तरतुदी करूनही राजकोषीय तूट स्थूल उत्पन्नाच्या तीन टक्क्यांच्या आत ठेवण्याचं कौशल्य अर्थसंकल्पात साधलं आहे, हे विशेष. देशातली सगळीच राज्यं कर्जांच्या ओझ्याखाली वाकत चालली आहेत. वाढतं शहरीकरण, या शहरांना सुविधा पुरवण्याचा ताण, अस्थिर राजकारण आणि त्यामुळे करावा लागणारा मतदाराचा अधिकाधिक अनुनय, त्यातून आलेल्या 'फुकट वाटप योजना' आणि कर आकारणीचं केंद्रीकरण, यांमुळे राज्य कात्रीत सापडली आहेत. महाराष्ट्र यात वेगळा नाही. तरीही यावेळचा अर्थसंकल्प सर्वंकष वाटतो आहे, तो फडणवीस यांच्या धाडस आणि आत्मविश्वासामुळे. वातावरणीय बदल, पर्यावरणाचं रक्षण, सार्वजनिक स्वच्छता, नैसर्गिक संसाधनांचे कार्यक्षम व्यवस्थापन आणि किफायती वापर, अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराला प्रोत्साहन, त्यासाठी तंत्रशिक्षणाचा प्रसार, सर्वांसाठी आरोग्य आणि रोजगाराच्या पुरेशा संधी हे आजच्या 'जेन-झीं'चे जिव्हाळ्याचे मुद्दे आहेत. अर्थसंकल्पाने या सगळ्याच क्षेत्रांना योग्यरीत्या न्याय दिला असून त्यातून राज्याची भविष्याची दिशाही स्पष्ट केली आहे. राज्यासाठी आणि राज्यातील जनतेसाठी अत्यंत दिलासादायक अर्थसंकल्प म्हणून या अर्थसंकल्पाची नोंद करावी लागेल.

महाराष्ट्र हे देशातील विकसित राज्य आहे. विकसित राज्यासमोरही अनेक आव्हानं असतात. मागास राज्यांची थोडीशी प्रगतीही आकड्यांमध्ये, टक्केवारीत मोठी दिसते. विकसित राज्यांचं तसं नसतं. एका विशिष्ट स्थितीला पोहोचल्यानंतर त्यानंतरची प्रगती आकड्यांमध्ये धीम्या गतीनेच पुढे सरकताना दिसते. विकसित राज्यातील जनतेच्या आकांक्षाही विकसितच असतात! त्या आकांक्षांना पुरं पडण्यासाठी करावी लागणारी गुंतवणूक, नावीन्यपूर्ण कल्पनांचे प्रयोग राबवण्यासाठी घ्यावी लागणारी जोखीम सोपी नसते. राज्य प्रगतीच्या वरच्या टप्प्यावर पोहोचल्यानंतर राज्यकर्त्यांसमोर उभी राहणारी आव्हानंही त्याच उंचीची असतात. कालच्या अर्थसंकल्पात या आव्हानांची जाणीव पदोपदी दिसते आहे. देशातलं प्रगत राज्य शेतकऱ्यांच्या आत्महत्यांमध्येही गेली काही वर्षं आघाडीवर आहे. परस्परविरोधी; पण हे सत्य आहे. हा विरोधाभास संपवण्याच्या दिशेने आणखी एक पाऊल म्हणून या अर्थसंकल्पात शेतकऱ्यांना जाहीर केलेली कर्जमाफी निश्चितच दिलासादायक ठरू शकते. एकूण कर्जातला दोन लाखांचा वाटा सरकारने उचलला, तरी बऱ्याच शेतकऱ्यांना त्यातून पुढच्या प्रयत्नांसाठी दिलासा मिळू शकतो. अशी कर्जमाफी यापूर्वी झाली नाही, असं नाही. त्या प्रत्येक वेळी तात्कालिक दिलासाही मिळाला. तो आवश्यक असला, तरी त्याने समस्या संपली नाही. पशुपालन, मत्स्यव्यवसायाची जोड हेच शेतीतल्या समस्यांना अधिक शाश्वत उत्तर आहे. 'प्राकृतिक शेती अभियान', 'मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजक योजना', आणि 'मुख्यमंत्री मत्स्यसंपदा योजना' समस्येवरचा दीर्घकालीन आणि शाश्वत उपाय ठरू शकतात. महाराष्ट्राच्या कृषी अर्थव्यवस्थेसाठी आवश्यक वीज, पाणी आणि अर्थ पुरवठा या तिन्हींचाही अर्थसंकल्पात साकल्याने केलेला विचार ग्रामीण महाराष्ट्रात नवचैतन्य आणल्याशिवाय राहणार नाही. परकीय गुंतवणूक आकर्षित करण्यात महाराष्ट्र हे देशातलं पहिल्या क्रमांकाचं राज्य आहे. हल्ली असा एकही आठवडा जात नाही, जेव्हा कोणत्या ना कोणत्या राष्ट्राचा प्रमुख किंवा औद्योगिक शिष्टमंडळ मुंबई भेटीवर नसतं. फडणवीस यांनी या आघाडीवर राज्याची आघाडी कायम ठेवली आहेच; पण अशा गुंतवणूकदारांना अधिकाधिक संधी उपलब्ध व्हाव्यात, यासाठी पायाभूत विकासासाठी केलेल्या तरतुदी अधिक आश्वासक आहेत. राज्यात आठ ते दहा 'एज्युसिटी' विकसित करण्याची, महामुंबईत नवी झोपडी उभी राहू नये यासाठी 'नो न्यू स्लम फ्रेमवर्क', मुंबई आणि परिसरातील वाहतूक कोंडीवर उपाय म्हणून भुयारी मार्गांचं जाळं, समृद्धी महामार्गाला मालवाहतूक कॉरिडॉरची जोड, 'महाराष्ट्र आरोग्य सार्वजनिक संस्थे'ची स्थापना किंवा कर्करोग, मधुमेह, हृदयरुग्णांच्या निदानासाठी ग्रामीण महाराष्ट्रात ४ हजार ५०० कोटी रुपयांचा निधी ह्या या अर्थसंकल्पातील विचारांची खोली दर्शवणाऱ्या बाबी आहेत. राज्याच्या विकासाच्या अंगोपांगांचा विचार करून काळाची पावलं आणि गती ओळखून तयार केलेला हा अर्थसंकल्प म्हणूनच कौतुकास्पद आहे. महात्मा फुले यांचं २०० वं जयंती वर्ष आणि संत गाडगेबाबांचं १५०वं जयंती वर्ष साधून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मरणासह हे वर्ष 'सामाजिक समता आणि समरसता वर्ष' म्हणून साजरं करण्याची कल्पना मांडून महायुतीने आपल्या सर्वसमावेशक विकासरथावर सामाजिक न्यायाचं जे निशाण फडकावलं आहे, ते सर्वार्थसूचक आहे!

# लोकमानस

### मुलखावेगळी माणस

सायकल भ्रमंती द्वारे पर्यावरण संवर्धनाचा संदेश

वेगाने होणारापर्यावरणाचा ऱ्हासआणि महिलांच्या प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी यवतमाळ जिल्ह्यातील प्रणाली चिकटे ही शेतकऱ्यांची कन्या 11 महिन्यापासून सायकलवरून राज्यभरात पर्यावरण व महिला सबलीकरण विषयासंदर्भात जनजागृतीसाठी फिरत आहे. पंढरपूर येथे आल्यानंतर प्रणाली चिकटे हिचा सत्कार सायकल असोसिएशनच्या वतीने करण्यात आला. आजपर्यंत पर्यावरणविषयक सायकल वरून प्रवास करत पुरुषांना संदेश देताना पाहिले आहे. प्रणालीला कोरोना महामारीमुळे मानवी समाजावर झालेले दुष्परिणाम दिसून आले. त्यातूनच महाराष्ट्र भ्रमण करण्याचा निर्णय घेतला. तिने 11 महिन्याच्या प्रवासात नागरिकांना दिवसेंदिवस वाढते प्रदूषण, ग्लोबल वार्मिंगचे दुष्परिणाम कशा प्रकारे होतात याचा संदेश दिला आहे.11 महिन्यांमध्ये प्रणालीने पर्यावरण विषयक संदेश देत 14 हजार किलोमीटरचा प्रवास केला. हा संदेश देत राज्याच्या कानाकोपऱ्यांत जाण्यासाठी तिचा मानस आहे. त्याचबरोबर महिला सबलीकरणावर भर दिला आहे. वाढते इंधन प्रदूषण रोखण्यासाठी नागरिकांनी जवळ फिराला जात असताना सायकलचा वापर करावा. यातून नागरिकांची शरीर तंदुरुस्त राहते यातून पेट्रोलची बचत होऊन इंधन प्रदूषणही रोखण्यात मदत होते. राज्याच्या पर्यावरण संवर्धनासाठी नागरिकांमध्ये जागृती निर्माण करणे गरजेचे असल्याची प्रणालीने यावेळी सांगितले. यवतमाळ जिल्ह्यातील वणी तालुक्यातील प्रणाली चिकटे राहते. पर्यावरण संवर्धनासाठी ही 21 वर्षाची प्रणाली महाराष्ट्र भ्रमंतीसाठी सायकलने प्रवास करत जनजागृती करते आहे. राज्यातील स्थानिक परिस्थितीचा अभ्यास, पर्यावरणाच्या संवर्धनासाठी जनजागृती, महिला सशक्तीकरणाचा जागर करत प्रणालीने सायकल भ्रमंतीचा निर्धार केला. प्रणाली राज्यभरातील सायकल भ्रमंतीसाठी गेले अनेक दिवस प्रवास करतीय.एकूणच प्रगतीसारख्या एका सामान्य कुटुंबातील एका असामान्य मुलीचे हे पर्यावरण संरक्षणासाठी सायकलवरून महाराष्ट्रभर भ्रमंती करण्याचे हे कार्य नक्कीच स्पृहणीय आणि तितकेच कौतुकास्पद आहे.





SUZUKI

### असा लागला शोध ; टेबल लॅम्प

टेबल लॅम्पचा शोध थेट एका व्यक्तीने लावला नसून, १८७९ मध्ये थॉमस एडिसनने दीर्घकाळ टिकणाऱ्या इलेक्ट्रिक बल्बचा शोध लावल्यानंतर, टेबलावर किंवा फर्निचरवर ठेवून काम करण्यासाठी प्रकाशाची (टास्क लाईट) गरज भासल्याने त्याचा विकास झाला पूर्वी तेलाचे दिवे, गॅसचे दिवे आणि नंतर वीज आल्यावर विजेवर चालणाऱ्या दिव्यांचा वापर वाढला, ज्यातून आधुनिक टेबल लॅम्पची संकल्पना रूढ झाली सर्वात आधी ज्वलनशील पदार्थात भिजवलेली वात असलेले भांडे (तेलाचे दिवे) वापरले जात असे थॉमस एडिसनने दीर्घकाळ टिकणारा लाइट बल्ब विकसित केला, ज्यामुळे पोर्टेबल प्रकाश उपकरणांचा मार्ग मोकळा झाला टेबलावर वाचताना किंवा काम करताना थेट प्रकाशाची गरज भासू लागली, ज्यामुळे दिवा एका ठराविक जागेवर (डेस्कवर) ठेवण्याची पद्धत सुरू झाली काच, धातू, प्लॅस्टिक आणि लाकडापासून बनवलेले, आणि सध्या LED तंत्रज्ञानासह ऊर्जा-कार्यक्षम टेबल लॅम्प उपलब्ध आहेत थोडक्यात, विजेच्या शोधामुळे आणि कामाच्या ठिकाणी थेट प्रकाशाच्या गरजेमुळे टेबल लॅम्पचा विकास झाला.

### चलती का नाम गाडी सुझुकी मोटरसायकलचा 'सुझुकी मात्सुरी' महोत्सव

जपानच्या सुझुकी मोटर कॉर्पोरेशनची दुचाकी उपकंपनी, सुझुकी मोटरसायकल इंडिया प्रा. लि. आपला प्रमुख मोटरसायकलिंग महोत्सव, सुझुकी मात्सुरी, मुंबईत परत आणण्यास सज्ज आहे. लुंड येथील रिचर्डसन अँड क्रूडास येथे होणारा हा कार्यक्रम शहरातील या महोत्सवाची दुसरी आवृत्ती असून, यात रायडिंगचा थरार, सामुदायिक सहभाग आणि मनोरंजनाचा दिवस अनुभवता येईल.

सुझुकी मात्सुरी हा एक सामुदायिक उत्सव आहे, जो दुचाकीस्वार आणि उत्साही लोकांना रायडिंगचा आनंद अनुभवण्यासाठी एकत्र आणतो. दिल्ली, बंगळूरु, हैदराबाद आणि यापूर्वी मुंबईत झालेल्या यशस्वी कार्यक्रमांनंतर, हा महोत्सव आकर्षक रायडिंग अनुभव, अधिक घट्ट सामुदायिक नाते आणि अविरत मनोरंजनासह परत येत आहे. मुंबई आवृत्तीचे एक प्रमुख आकर्षण म्हणजे नवीन सुझुकी बर्गमन स्ट्रीटचे प्रत्यक्ष ग्राहक अनावरण, जे या उत्पादनाबद्दल अभियंत्यांची तीव्र आवड दर्शवते. नवीन मॅक्सी-स्टाईल डिझाइन असलेली ही स्कूटर, अधिक आरामासाठी सुधारित रायडिंग पोझिशन देते. यासोबतच एक तेजस्वी ड्युअल एलईडी हेडलॅम्प आणि नव्याने वापरलेले १२-इंची मागील चाक, हे सर्व मिळून रायडिंगचा आत्मविश्वास आणि दैनंदिन सोय वाढवतात. नवीन बर्गमन स्ट्रीट उत्कृष्ट आराम, सुरळीत कामगिरी आणि शहरी उपयुक्तता यांचा सुरेख संगम साधते. कार्यक्रमातील अभ्यागतांना नियंत्रित रायडिंग वातावरणात टेस्ट राइडद्वारे स्कूटरचा अनुभव घेण्याची विशेष संधी मिळेल, तसेच जागेवरच बुकिंग करण्याची सुविधाही उपलब्ध असेल.

■ संकलन –संयोजन सुबोध रणशेवरे



## महापालिकेच्या वतीने "महात्मा ज्योतीबा फुले" यांना अभिवादन

■ नांदेड प्रतिनिधी

स्त्री शिक्षणाचे जनक आणि थोर समाजसुधारक क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या वतीने दि.११ एप्रिल २०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता शहरातील औद्यागिक प्रशिक्षण केंद्राजवळील "महात्मा ज्योतीबा फुले" यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास महापौर सौ.कविता संतोष मुळे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी उपमहापौर दिलकसिंग रावत आणि मनपा आयुक्त डॉ.महेशकुमार डोईफोडे यांनी सुद्धा ज्योतिबांना अभिवादन केले.

याप्रसंगी महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा विद्यमान राज्यसभा खासदार अशोकराव चव्हाण, भोकर मतदासंघाच्या आमदार श्रीजया चव्हाण, माहिला बाल कल्याण सभापती सदिच्छा सोनी पाटील, भाजपा महानगराध्यक्ष अमरनाथ राजुरकर यांची प्रमुख उपस्थिती होती. "महात्मा ज्योतिबा फुले यांनी शिक्षणाची दारे सर्वांसाठी उघडी करून समाजात समतेचा विचार रुजवला. त्यांचे विचार समाजाला आजही दिशा देणारे आहेत" असे विचार यावेळी मान्यवरांनी व्यक्त केले. या अभिवादन कार्यक्रमास पालिकेतील नगरसेवक, विविध विभागाचे प्रमुख अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी महात्मा फुले यांच्या सत्यशोधक विचारांचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प केला.

## समाज प्रबोधनकार पवन महाराज दवंडे यांच्या कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद

### महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर संयुक्त जयंती सोहळयास परळीत सुरुवात

■ परळी प्रतिनिधी.

प्रसिद्ध खंजिरी वादक व प्रबोधनकार सत्यपाल महाराज यांचे शिष्य पवन महाराज दवंडे यांच्या शिव, फुले ,शाहू, आंबेडकर समाज प्रबोधन कार्यक्रमास उस्फूर्त प्रतिसाद मिळाला. परळी शहरातील शिवाजीनगर येथे क्रांतीसुर्य महात्मा फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 135 व्या जयंतीच्या निमित्ताने संयुक्त जयंती सोहळ्यास काल दिनांक 11 एप्रिल पासून सुरुवात झाली.

क्रांतीसुर्य महात्मा फुले यांची 199 जयंती 11 एप्रिल रोजी तर विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची 135 वी जयंती 14 एप्रिल रोजी उत्साहात साजरी करण्यात येत आहे



.या निमित्ताने शिवाजीनगर परळी येथे संयुक्त जयंती महोत्सव सोहळ्यास सुरुवात झाली. रात्री 8 वाजता लुंबिनी बुद्ध विहार येथे या कार्यक्रमाचे उद्घाटन दिव्यांग विभागाचे महाराष्ट्राचे अध्यक्ष डॉ. संतोष मुंडे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रसिद्ध साहित्यिक अजयकुमार गंडले होते .तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिद्ध साहित्यिक व पत्रकार रानबा गायकवाड, नगरसेवक निळकंठ चाटे, नगरसेवक पिंटुभैय्या मुरकुटे, नगरसेवक भीमराव डावरे, पृथ्वी शिंदे, दिनेश गजमल आदी उपस्थित होते. यावेळी बोलताना डॉ.संतोष मुंडे म्हणाले की, एप्रिल महिन्यात तीन दिवसांत दोन महापुरुषांचा जन्म झाला आहे.त्यामुळे महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा जागर झाला पाहिजे.तर अध्यक्षीय भाषणात अजयकुमार गंडले यांनी महात्मा फुले यांच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकताना महात्मा फुले हे त्याकाळी प्रचंड श्रीमंत होते तरी त्यांनी बहुजनांच्या उद्धारासाठी स्वतःला वाहून घेतले. महात्मा फुले यांनीच रयतेचे राजे कुळवाडी भूषण छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जिवनावर एक हजार ओळींचा प्रथम पोवाडा लिहिला.तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा आदर्श आजच्या तरुणांनी घ्यावा असे आवाहन केले. यावेळी निळकंठ चाटे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

यावेळी समाज प्रबोधनकार पवन महाराज दवंडे यांनी खास शैलीत आजच्या भोंदुगिरीवर व देशातील विदारक परिस्थितीवर हल्ला चढवला. तसेच मनोरंजनातून प्रबोधन करतांना उपस्थित सर्वांना मंत्रमुग्ध केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महात्मा फुले व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक संयुक्त जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष दिनेश गजमल उपाध्यक्ष सचिन कांबळे सचिव हरीश चव्हाण कोषाध्यक्ष मेघराज पारधे, कोषाध्यक्ष गणेश मोदानी आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन कवी सिद्धेश्वर इंगोले यांनी केले. कार्यक्रमास शिवाजीनगर तसेच परिसरातील महिला, पुरुष, बालक, बालिका मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# आमदार सुरेश धस यांनी मागणी करताच सीना प्रकल्पातून पाणी सोडले, ग्रामस्थांकडून आभार व्यक्त





**आष्टी (प्रतिनिधी)**

आष्टी तालुक्यातील शेतकऱ्यांच्या पाणी प्रश्नावर आमदार सुरेश धस यांनी पत्राद्वारे मागणी करताच यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश मिळाले असून, सीना प्रकल्पाच्या उजव्या कालव्यातून सिंचनासाठी पाणी सोडण्यास सुरुवात करण्यात आली आहे. आमदार सुरेश धस या निर्णयामुळे परिसरातील शेतकरी व ग्रामस्थांना मोठा दिलासा मिळाला आहे.

आष्टी मतदारसंघात आमदार सुरेश धस यांनी कुकडी पाटबंधारे विभाग क्र. २, श्रीगोंदा येथील कार्यकारी अभियंत्यांना पत्राद्वारे आष्टी तालुक्यातील सीना प्रकल्पाच्या लाभ क्षेत्रातील पिंपरी (घुमरी), कानडी बुद्रुक आणि वाकी या तीन बंधाऱ्यांमध्ये पाणी साठवून शेती सिंचनासाठी तातडीने पाणी सोडण्याची मागणी केली होती. या मागणीची त्वरित दखल घेत प्रशासनाने सकारात्मक प्रतिसाद देत आवश्यक ती कार्यवाही पूर्ण केली.

प्रत्यक्ष उजव्या कालव्यातून पाणी सोडण्यात आल्याने लाभ क्षेत्रातील पिकांना मोठा आधार मिळणार असून, जनावरांच्या पाण्याचाही प्रश्न सुटण्यास मदत होणार आहे.

या पार्श्वभूमीवर स्थानिक ग्रामस्थ आणि शेतकरी यांनी आमदार सुरेश झ यांच्या प्रयत्नांचे कौतुक करत त्यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त केले. "योग्य वेळी पाणी मिळाल्यामुळे आमची मोठी चिंता दूर झाली," अशा भावना ग्रामस्थांकडून व्यक्त करण्यात आल्या.

याबाबत आमदार सुरेश धस यांनी सांगितले की, "शेतकऱ्यांच्या अडचणी सोडवणे हे माझे कर्तव्य आहे. भविष्यातही त्यांच्या प्रश्नांसाठी सातत्याने पाठपुरावा करत राहणार आहे."

दरम्यान, प्रशासनाकडूनही या भागातील पाणीपुरवठा सुरळीत व नियोजनबद्ध ठेवण्यासाठी विशेष लक्ष दिले जाणार असल्याचे सांगण्यात आले.

# स्नेहसंमेलनामुळे विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव : संगीता पाटील

## कासेगाव येथील जिल्हा परिषद शाळेत स्नेहसंमेलन उत्साहात



**जि. प. शाळा कासेगाव नं.१ मध्ये गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करताना संगीता पाटील, सुप्रियाताई पाटील, कल्पनाताई गावडे, सुजित पाटील ,वसंत शिंगारे**

**शिराळा/प्रतिनिधी**

स्नेहसंमेलनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुणांना वाव मिळतो. पुस्तकी ज्ञानाबरोबर विद्यार्थ्यांचे कलागुण विकसित होणे आवश्यक आहे. संमेलनाच्या माध्यमातून यासाठी मोठे व्यासपीठ उपलब्ध होत आहे, असे प्रतिपादन सांगली जिल्हा परिषदेच्या नूतन अध्यक्षा सौ. संगीता पाटील यांनी केले.

कासेगाव ता.वाळवा येथील जिल्हा परिषद शाळा नं.१ मध्ये स्नेहसंमेलना निमित्त आयोजित केलेल्या गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभ त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी वाळवा पंचायत समितीच्या सदस्या सौ. सुप्रियाताई पाटील होत्या.

वाळवा पंचायत समितीच्या सदस्या सुप्रियाताई पाटील यांच्या हस्ते सरस्वती पूजन करण्यात आले. स्नेहसंमेलनाचे उद्घाटन लोकनियुक्त सरपंच सौ. कल्पनाताई गावडे, उपसरपंच सुजित पाटील, सामाजिक कार्यकर्ते सचिन पाटील, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अमित काळे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी जिल्हा परिषद अध्यक्षा संगीता पाटील पुढे म्हणाल्या, आमदार जयंत पाटील यांच्या माध्यमातून जिल्ह्यामध्ये मॉडेल स्कूल ही संकल्पना राबवून जिल्हा परिषद शाळांचा कायापालट केला आहे. यापुढील काळातही शिक्षण क्षेत्राला अधिक गती देऊन विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्याचा प्रयत्न करूया.

प्रास्ताविक वरिष्ठ मुख्याध्यापक अनिल रोकडे यांनी केले. या वेळी विद्यार्थ्यांचा विविध संस्कृतीक कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. शैक्षणिक वर्षांमध्ये आयोजित केलेल्या समृद्धी परीक्षा, मंथन परीक्षा,डॉ.पतंगराव कदम गुणवत्ता चाचणी, गुणवत्ता शोध चाचणी, नवोदय परीक्षा या बौद्धिक स्पर्धेमध्ये यश संपादन केलेल्या तसेच केंद्रस्तरीय व तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेमध्ये यश संपादन केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार प्रमुख मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

वाळवा पंचायत समितीच्या सदस्या सुप्रियाताई पाटील म्हणाल्या, शाळेसाठी व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन विकासासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व भौतिक सुविधा पंचायत समितीच्या माध्यमातून देण्याचा आमचा प्रयत्न राहील. अधिक गुणवत्ता वाढीसाठी शिक्षकांनी सातत्याने प्रयत्नशील राहावे असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी कल्पनाताई गावडे, सुजित पाटील, सचिन पाटील व केंद्रप्रमुख वसंत शिंगारे यांनी मनोगत व्यक्त केले.स्वागत वैशाली पाटील यांनी केले. आभार पार्वती शिंगारे यांनी मानले.

याप्रसंगी अमित काळे, उज्वला शिंदे, समीना मुल्ला, संध्या संपकाळ, सुप्रिया पाटील, शांताराम संपकाळ,शहाजी मदने, सुनील दगडे, संदीप शिंदे, गोपीनाथ आडके, संजय तपासे, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, पालक, विद्यार्थी उपस्थित होते.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची 135 वी जयंती उत्साहात साजरी



परळी वैजनाथ : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 135 व्या जयंतीनिमित्त महाराष्ट्र असंघटित कामगार संघटनेच्या वतीने मातोश्री कॉम्प्लेक्स येथील कार्यालयात उत्साहपूर्ण वातावरणात जयंती साजरी करण्यात आली. या प्रसंगी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या विचारांचे स्मरण करत सामाजिक समता, बंधुता आणि शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले.

कार्यक्रमाला कामगार संघटनेचे अध्यक्ष अयुबखा पठाण, सचिव जगदीश इगवे, सहसचिव नसीबखा पठाण, बीड चौफेर चे संपादक बालाजी ढगे, राजाराम तोरडमल, महेश शिवगण, गौरव धुमाळ तसेच संघटनेचे इतर पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी उपस्थितांनी डॉ. आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प व्यक्त केला. कार्यक्रमात कामगार बांधवांमध्ये एकजूट आणि सामाजिक जाणीव वाढवण्याचा संदेश देण्यात आला.



**आष्टी - पत्रकार सचिन रानडे यांचा वाढदिवसानिमित्त आष्टी तालुका पत्रकार संघाच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी पत्रकार संघाचे अध्यक्ष संतोष सानप, ज्येष्ठ पत्रकार प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे, उत्तम बोडखे,भीमराव गुरव,शरद तळेकर, शरद रेडेकर,गणेश दळवी, प्रवीण पोकळे हे उपस्थित होते.**

# तांबवा येथे भीमजन्मोत्सव 2026 उत्साहात साजरा





## विद्यार्थ्यांचा मोठा प्रतिसाद



**तांबवा | प्रतिनिधी**

भीमजन्मोत्सव २०२६ निमित्त भिमरत्न युवा प्रतिष्ठान, तांबवा तर्फे आयोजित कार्यक्रम आज उत्साहात व यशस्वीपणे पार पडला. तांबवा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व गणेश माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

कार्यक्रमाला गावाचे सरपंच, शाळेतील सर्व शिक्षक व कर्मचारी वर्ग उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी शिस्तबद्धपणे सहभाग घेतला व संपूर्ण कार्यक्रमात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

या प्रसंगी विविध भाषणे आयोजित करण्यात आली. विशेषतः अलका लांब मॅडम यांनी साकारलेली रमाईंची भूमिका अत्यंत प्रभावी ठरली. त्यांच्या भावनिक सादरीकरणामुळे उपस्थितांच्या डोळ्यांत अश्रू दाटले आणि सर्वांनी त्यांच्या अभिनयाचे मनापासून कौतुक केले.

तसेच कार्यक्रमात विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. गुणवंत विद्यार्थ्यांना ट्रॉफी, प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले, तर सर्व विद्यार्थ्यांना एक वही व एक पेन वाटप करण्यात आले. सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व अल्पोपहारही देण्यात आला.

भिमरत्न युवा प्रतिष्ठानच्या सर्व सदस्यांनी समन्वय साधत हा उपक्रम यशस्वीपणे पार पाडला. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण होऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची प्रेरणा मिळाली, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
Last page
● बीड, बुधवार, 15 एप्रिल 2026

# शिक्षण, स्वाभिमान आणि संघटन हीच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची त्रिसूत्री - प्रा. डॉ. सिद्धार्थ तायडे

## वसुंधरा महिला महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात संपन्न

**परभणी/प्रतिनिधी:**

एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, मुंबई संलग्नित स्व. कौशल्याबाई दुधगांवकर सेवाभावी संस्था, दुधगांव संचलित

वसुंधरा महिला महाविद्यालय, टाकळी (कुं.), ता. जि. परभणी येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमात प्रख्यात साहित्यिक तथा सिने-नाट्य दिग्दर्शक प्रा. डॉ. सिद्धार्थ तायडे यांनी प्रमुख व्याख्याता म्हणून उपस्थित राहून मार्गदर्शन केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकताना प्रा. डॉ. सिद्धार्थ तायडे म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केवळ राज्यघटना दिली नाही, तर 'शिक्षण, स्वाभिमान आणि संघटन' ही त्रिसूत्री देऊन वंचित समाजाला सन्मानाने जगण्याचा मार्ग दाखवला. या महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी संविधानातील मूल्यांचा अंगीकार करून स्वतःचे व्यक्तिमत्त्व घडवणे, हीच खऱ्या अर्थाने डॉ. बाबासाहेबांच्या जयंतीची सार्थकता ठरेल. आजही त्यांचे विचार दीपस्तंभाप्रमाणे समाजाला दिशा देण्याचे काम करत आहेत.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य तथा साहित्यिक प्रा. प्रकाश वाकळे यांनी भूषविले. आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा आढावा घेताना 'शिक्षण हेच परिवर्तनाचे प्रमुख साधन' असल्याचे अधोरेखित केले. भारतीय राज्यघटनेतील मूल्यांचे जतन करणे ही काळाची गरज असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

या सोहळ्यात महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्यावर आधारित प्रेरणादायी भाषणे आणि कविता सादर केल्या. कार्यक्रमास प्रा. ऋतुजा दुधगावकर, प्रा. एल. आर. पत्रे, एन. जी. महाजन, एस. बी. खानापुरे, सर्व प्राध्यापकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कर्मचारी एम. एस. उफाडे , व्ही. आर. घनसावंत यांनी परिश्रम घेतले .





# डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त पत्रकार संतोष ससाणे पत्नी शितल ससाणे या दांपत्याचा मरणोत्तर देहदानाचा संकल्प!

**प्रतिनिधी – सोपान पगारे**

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी अत्यंत प्रतिगामी परिस्थिती असताना या देशातील शोषित, पीडित,शूद्र अति शूद्र व महिलांसाठी जे कार्य केले ते अतुलनीय आहे. पशुवत जीवन असलेल्या शूद्र अति शूद्रांचा स्वाभिमान जागा केला.भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या संपूर्ण जीवनामध्ये खूप त्याग, कष्ट, हाल, अपेष्टा सहन करत वेळप्रसंगी आपल्या कुटुंबाची ही परवा न करता आपले संपूर्ण आयुष्य खर्ची घालून बहुजन उद्धाराचे कार्य केले,त्यांनी आपल्या असामान्य ज्ञानाच्या जोरावर जगातील सर्वोत्कृष्ट संविधानिक लोकशाही व्यवस्था निर्माण करून देशवासीयांना स्वाभिमानाने,सन्मानाने, जीवन जगता यावे यासाठी सर्वांना समान हक्क अधिकार दिले आणि करोडो बहुजनांचा उद्धार केला.कितीही जन्म घेतले त्यांच्या उपकाराची परतफेड करणे अशक्य आहे,परंतु त्यांनी आपल्या अनुयायाकडून एवढीच अपेक्षा व्यक्त केली होती की,मी महत प्रयासाने समाज विकासाचा गाडा इथपर्यंत आणला आहे तो पुढे नेण्यासाठी तुम्ही प्रयत्न करावा परंतु तो मागे हटता कामा नये,त्यांनी समाजाच्या विकासासाठी याच भारत भूमीतील सर्वोत्तम भूमिपुत्र भगवान गौतम बुद्धांच्या धम्म दिला, त्याचे अनुकरण व त्याचा प्रचार प्रसार करण्याचे तरुणांना सांगितले,त्यांच्या विचारावर चालत असताना, सामाजिक धार्मिक कार्य करत असताना, त्यांच्या विचारातून



प्रेरणा घेऊन आयुष्यभर त्यांच्या विचाराचं त्यांनी दिलेल्या विज्ञानवादी बौद्ध धम्माच कार्य करत राहण्याचा वसा घेतलेले आष्टी तालुक्यातील धामणगाव येथील सामाजिक कार्यकर्ते म्हणजे संतोष ससाणे आणि त्यांच्या पत्नी शितल ससाणे. या ससाणे दांपत्यांनी या वर्षी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीच्या निमित्ताने मरणोत्तर देहदान करण्याचा संकल्प करत डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना जयंतीदिनी अनोखे अभिवादन केले आहे,आयुष्य संपल्यानंतर या देहाची राख रांगोळी, माती होण्यापेक्षा, तो आपला देह वैद्यकीय महाविद्यालयात शिकणाऱ्या शिकाऊ डॉक्टरांना प्रयोगासाठी उपयोगी ठरावा, त्यातून त्यांना अजून मानवी जीवनासाठी सखोल अभ्यास करता यावा यानिमित्ताने आपला देह मरणोत्तरही समाजासाठी कामी यावा, या सामाजिक आणि बुद्ध धम्माच्या दान पारमितीच्या पालन या भावनेतून त्यांनी मरणोत्तर आपला देह स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय अंबाजोगाई येथील वैद्यकीय महाविद्यालयासाठी स्व ईच्छेने अर्ज करत,घोषणापत्र देत देहदान करण्याचा संकल्प केल्याचे पत्र वैद्यकीय अधिकारी ग्रामीण रुग्णालय आष्टी यांच्याकडे सुपूर्त केला, त्यांच्या या निर्णयाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे,यावेळी आरोग्य अधिकारी रामदास मोराळे, आष्टी भीमजयंती अध्यक्ष सुनील शिंदे सर, जेस्ट पत्रकार प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे, रिपाई नेते अरुण निकाळजे, बोद्ध महासभा तालूका अध्यक्ष रत्नकांत निकाळजे,सरचिटणीस आकाश कांबळे, आष्टी शहर अध्यक्ष किशोर निकाळजे, विजय काळे सुनील साळवे, रिपाई युवा कुणाल निकाळजे, समता सैनिक काळे आदि उपस्थित होते





**विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या 135 व्या जयंतीनिमित्त त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले यावेळी अ‍ॅड. शिवाजी कांबळे समाजवादी पार्टी प्रदेश सचिव/चर्मकार सेल प्रदेशाध्यक्ष, तसेच सालेहा जिलानी शेख महिला बीड जिल्हाध्यक्ष, जिलानी शेख तालुकाध्यक्ष अंबाजोगाई, राजेश परदेशी शहराध्यक्ष अंबाजोगाई.**



**14 एप्रिल 2026 रोजी खामगाव येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची 135 वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळेस उपस्थित सरपंच दत्ता बडे. माजी सरपंच श्रीराम आबा बडे. राजाभाऊ बडे ग्रामपंचायत सदस्य उपसरपंच छगन दादा गायकवाड. मोतीराम गायकवाड. आणि गायकवाड व सर्व ग्रामस्थ**

# मराठवाड्याच्या विकासात डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे मोलाचे योगदान : प्रा डॉ राजकुमार चाटे

## लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी








**परळी वैजनाथ | प्रतिनिधी**

मराठवाड्याच्या विकासात डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे मोलाचे योगदान असल्याचे प्रतिपादन प्रा डॉ राजकुमार चाटे यांनी केले. ते लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने आयोजित भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त कार्यक्रमात बोलत होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला संस्थेचे अध्यक्ष संजयजी देशमुख, प्रमुख वक्ते प्रा डॉ राजकुमार चाटे, प्राचार्या डॉ विद्याताई देशपांडे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा डॉ विवेकानंद कवडे यांच्या हस्ते भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी पुढे बोलताना प्रा डॉ चाटे म्हणाले की, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे बहुआयामी व्यक्तिमत्व होते. मराठवाडा मुक्ती संग्रामात कारवाई करताना मिलिटरी कारवाई ऐवजी पोलीस कारवाई हे नाव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या मुळे दिले गेले. कारण आंतरराष्ट्रीय स्तरावर याचा परिणाम होणार होता म्हणून है नाव देण्यात आले. यामुळे निजामाला युनोकडे दाद मागता आली नाही. महाराष्ट्र निर्मिती मध्ये मराठी भाषिकांची तीन राज्य निर्माण करण्याची डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची भुमिका होती. कारण मराठवाड्याचा विकास याशिवाय होणार नाही. ती भुमिका आज बरोबर आहे असे दिसून येते. याच कार्यक्रमात सतत १८ तास अभ्यास उपक्रमात सहभागी झालेल्या विद्यार्थिनींचा सत्कार व संयोजन समितीतील सदस्यांचा सत्कार उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी प्राचार्य डॉ विद्या देशपांडे यांनी मनोगत व्यक्त केले तर कार्यक्रमाचे अध्यक्ष संजय देशमुख यांनी अध्यक्षीय समारोप केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा प्रविण फुटके, आभार प्रा डॉ विना पारेकर यांनी तर सूत्रसंचालन प्रा डॉ अरुण चव्हाण यांनी केले. कार्यक्रमास विद्यार्थी, प्राध्यापक, शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.